**सन २०२६-२७ मध्ये राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे आयोजित करणे ही योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः शेअदौ-२०२६/प्र.क्र.६१(ई.क्र. १६६७३५३ ) /३-अे,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२

**दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२६**

वाचा -

१) कृमास ४१०४/प्र.क्र.५२/३-अ, दि. १६ नोव्हेंबर, २००४

२) शेविदौ ४२०४/प्र.क्र.६७/३-अ, दि. २९ मार्च, २००५

३) शेविदौ ४२०५/प्र.क्र.१५२/३-अ, दि. ३१ मार्च, २००६

४) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. शैविदो ४२०७/प्र.क्र.१४५/३-अे, दि.०६.०६.२००७

५ ) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. शैविदो ४२०७/प्र.क्र.१४५/३-अे, दि. ०२.११.२००७

६) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. शैविदो ४२११/प्र.क्र.३८/३-अे, दि. ०९.०३.२०११

७) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. शैविदो ४२१२/प्र.क्र.१०१/३-अे, दि. १८.०७.२०१२

८) उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णयक्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग- ४, दि.०१.१२.२०१६

९) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.शेअदौ-२०२५/प्र.क्र.९२ (भाग-१)/ ३-अे (ई.११५७५२६), दि. १४.१०.२०२५

१०) संचालक (विस्तार व प्रशिक्षण),यांचे पत्र जा.क्र.शेमा/शेपदौ २६-२७/शा.मा. प्रस्ताव/२०१/२०२६, दि.२४.०७.२०२६

प्रस्तावना -

राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशातील विकसीत आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी तसेच शेतमालाची निर्यात / कृषि मालाचे पणन व बाजारपेठेतील मागणी, कृषि माल प्रक्रिया याबरोबरच त्या देशांमध्ये उपयोगात येत असलेले अद्ययावत तंत्रज्ञान अवगत करुन त्याचा वापर राज्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतावर/शेतीमध्ये करण्यासाठी सहाय्य करणे, विविध देशांनी विकसीत शेती तंत्रज्ञान व अनुषंगिक बाबी यांची माहिती त्या देशातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करुन तसेच क्षेत्रिय भेटी, संबंधित संस्थांना भेटी इत्यादीद्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरीता कृषि विभागाकडून राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे ही योजना सन २००४-०५ पासून राबविण्यात येते.

“राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे” या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता (२४०१ ४३६५) या लेखाशिर्षाखाली रु. ४००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय यांनी संदर्भ क्र. १० येथील पत्रान्वये “राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे” राज्य पुरस्कृत योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सन २०२६-२७ मध्ये “राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे” ही योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

सन २०२६-२७ मध्ये "राज्यातील शेतक-यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे" ही योजना राबविण्यासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रू.४००.०० लक्ष (अक्षरी रुपये चार कोटी फक्त) एवढ्या निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सन २०२६-२७ या वर्षाकरिता जिल्हास्तरावरून प्रति जिल्हा ०५ याप्रमाणे ३४ जिल्ह्यांमधून एकूण १७० शेतकऱ्यांची, तसेच राज्यस्तरीय समितीमार्फत १० शेतकऱ्यांची, अशा एकूण १८० शेतकऱ्यांची निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, प्रति २० शेतकऱ्यांमागे ०१ अधिकारी याप्रमाणे एकूण ०९ अधिकाऱ्यांची निवड करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदी, वित्तीय नियम व प्रचलित विहित तरतुदी तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच, सदर योजना सन २०२६-२७ मध्ये राबविण्यासाठी आवश्यक सविस्तर मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि) यांनी निर्गमित कराव्यात.

४. सदर योजना राबविण्याकरिता आयुक्त (कृषि) यांना नियत्रक अधिकारी तसेच सहायक संचालक (लेखा-१) , कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०२२१२३९५६०७४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.10.22 12:42:16 +05'30'

**(ग. सं . कचरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा.मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२
३. सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल - १/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर
७. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१०. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. वित्त विभाग (का.व्यय-१) (अर्थसंकल्प-१२)(अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.३२
१३. नियोजन विभाग, कार्यासन - १४१४, १४३१, मंत्रालय, मुंबई.३२
१४. कार्यासन अधिकारी, २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती (कार्यासन-३अे)